# इतिहास संशोधनासाठी मोडी ज्ञान आवश्यक

## 'मोडी अंकलिपी' पुस्तिकेचे प्रकाशन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शेकडो वर्षांची परंपरा लाभलेल्या मोडी लिपीची लाखो कागदपत्रे आजही ठिकठिकाणी उपलब्ध आहेत. शासनाच्या पुराभिलेख विभागासह इतिहास संशोधन संस्थांमध्ये या ऐतिहासिक दस्तऐवजांचे जतन-संवर्धन केले जात आहे. मोडी कागदपत्रात विविध विषयांचा मोठा इतिहास लपला आहे. तो प्रकाशात आणण्यासाठी मोडी लिपीचे ज्ञान, अभ्यास, प्रशिक्षक अत्यावश्यक आहे. यासाठी 'प्रशिक्षण मोडी लिपीचे' या मोडी अंकलिपीसारखे प्रयोग उपयोगी ठरतील, असा विश्वास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केला.

ऐतिहासिक मोडी लिपीची गोडी नव्या पिढीत निर्माण व्हावी यासाठी खारीचा वाटा म्हणून शिवाजी पेठेतील युवा इतिहास अभ्यासक आदित्य अतुल माने याने तयार केलेल्या 'प्रशिक्षण मोडी लिपीचे' या अंकलिपीचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक व शिवकालीन शस्त्रास्त्र संग्राहक गिरीश जाधव, औंध (सातारा) येथील श्री भवानी चित्रसंग्रहालयाचे उपअभिरक्षक उदय सुर्वे, न्यू कॉलेजच्या इतिहास विभागप्रमुख डॉ. कविता गगराणी, ज्येष्ठ प्रा. बी. पी. चव्हाण, शिवाजी विद्यापीठातील विशेष कक्षप्रमुख उमेश भोसले आणि अतुल माने आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : आदित्य माने लिखित मोडी अंकलिपीचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी गिरीश जाधव, उदय सुर्वे, डॉ. कविता गगराणी, प्रा. बी. पी. चव्हाण, उमेश भोसले, अतुल माने आदी.**

मोडी अंकलिपी निर्मितीसाठी पुराभिलेखागार विभागाचे अभिलेख अधिकारी गणेश खोडके, इतिहास अभ्यासक राम यादव, आयुर्वेदिक डॉ. अजित रजिगरे आदींचे मार्गदर्शन लाभल्याचे लेखक आदित्य माने याने सांगितले. प्रास्ताविकात गिरीश जाधव यांनी इतिहास जतन-संवर्धन-संरक्षणाबरोबरच अभ्यासासाठी नव्या पिढीकडून भरघोस प्रयत्न सुरू आहेत. विविध पैलूंवर अभ्यास करणाऱ्या संशोधकांची संख्या मोठी आहे. त्यांच्या संशोधनाला शासकीय, शैक्षणिक स्तरावर आवश्यक पाठबळ मिळणे गरजेचे आहे. इतिहास संशोधन, वस्तुसंग्रहालयशास्त्र, मोडीसह इतर ऐतिहासिक भाषा व लिप्यांचा अभ्यास व प्रशिक्षण यासाठी प्रोत्साहन मिळणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

उदय सुर्वे यांनी इतिहास संशोधन क्षेत्रात युवकांना बरेच काही करण्याच्या संधी उपलब्ध आहेत. ही संधी साधून राष्ट्राची संपत्ती असणाऱ्या इतिहासाचे जतन-संवर्धन करण्याचे आवाहन केले.